# नव्या माध्यमांसोबत जुने जतन करण्याचे आव्हान

● विवेक कांबळे

**स्वा. वि. दा. सावरकर नगरी, ठाणे :** संवाद तंत्रज्ञानाने अवघे जग कवेत घेतले आहे. या तंत्रज्ञानाचे जितके फायदे आहेत तितके तोटेही आहेत... तंत्रज्ञानातील बदलातून भाषा विकसित करू आणि नव्या जगाचे आव्हान स्वीकारण्यास तयार होऊया, असा सूर 'संवाद तंत्रज्ञानाचा मराठी लेखनकलेवर होणारा परिणाम' या परिसंवादातून उमटला. जनकवी पी. सावळाराम सभामंडपात आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी विज्ञानलेखक निरंजन घाटे होते. परिसंवादात समीरण वाळवेकर, यमाजी मालकर, राजीव तांबे, मंदार जोगळेकर सहभागी झाले होते.

प्रसारमाध्यमांत अनेक वर्षे कार्यरत असणाऱ्या समीरण वाळवेकर यांनी आगामी काळात तंत्रज्ञानाशिवाय आपल्याकडे

८४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ठाणे, २०१०

पर्याय उपलब्ध राहणार नाही, असे स्पष्ट केले. १९७०च्या दशकात दूरदर्शनमुळे माध्यम जगाचे दार भारतात उघडले गेले. सध्या ५१९ वाहिन्या आपल्याला दूरचित्रवाणी संचावर पाहता येतात. दूरदर्शनच्या युगानंतर आपल्याकडे संगणयुग आले. संगणकाने मानवी जीवनात अनेक बदल केले. लेखनकलेतही संगणकाचा वापर सहज शक्य आहे. त्याचा लेखकाला फायदा मिळू शकतो. बऱ्याचदा ग्रंथव्यवहारात लेखकावर अन्यायच होतो. या माध्यमातून प्रकाशित होणाऱ्या ई-बुक्समधून लेखकाने फायदा मिळवण्यासाठी पुढे आले पाहिजे. येत्या एक-दोन वर्षांत



**'संवाद तंत्रज्ञानाचा मराठी लेखनकलेवर होणारा परिणाम' या परिसंवादात यमाजी मालकर यांनी आपले विचार मांडले.**

आपल्याकडे आभासी विद्यापीठ येण्याची शक्यता आहे. नेटवरूनच आपल्याला परीक्षा देता येईल, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

पत्रकार यमाजी मालकर यांनी संगणक युगामुळे भारत आणि इंडिया असा फरक पडत असल्याची बाब निदर्शनास आणली. शहरी भागात संगणकाचा वापर आहे. मात्र खेडेगावात आजही अनेक तास वीज नसते. इथल्या विद्यार्थ्यांनी संगणक हाताळावेत हा आग्रह चुकीचा आहे. भारतात ४० टक्के नागरिकांची बँकेत खाती नाहीत. १० टक्के निरक्षर आहेत. त्यांच्यापर्यंत संगणक जाण्यासाठी सरकारकडून प्रयत्न होणे आवश्यक आहे. भारतात ८ हजार भाषा आहेत. त्यात मराठीचा १५वा क्रमांक लागतो. ही १५वी भाषा संगणकात तडजोडीविना पाहिजे. १० कोटीच्या महाराष्ट्रात स्वतःचा स्वतंत्र कळफलक (की-बोर्ड) नाही, ही शोकांतिका आहे. संगणक युगाची मक्तेदारी विशिष्ट वर्गाकडेच चालली आहे. या त्रुटी दूर करून हे माध्यम लोकाभिमुख करण्यासाठी सरकारकडून मूलभूत संशोधन होणे गरजेचे आहे, असे आवाहन त्यांनी केले.

आताची पिढी त्यांचे पर्याय संगणकाच्या माध्यमातून धुंडाळायला लागली आहे. वेगळे काही तरी शिकण्याची गोडी या माध्यमातून तरुण पिढीला लागली आहे. कोणतीही भाषा शुद्ध वा अशुद्ध नसते, ती प्रमाणित वा अप्रमाणित असते. वेब लँग्वेजसही भविष्यात प्रमाणित भाषा होईल. जगाची ती गरज होईल, असे मत बालसाहित्यलेखक राजीव तांबे यांनी मांडले.

'बुकगंगा डॉटकॉम'चे निर्माता मंदार जोगळेकर यांनी ई-बुकची संकल्पना स्पष्ट केली. प्रकाशनाअभावी चांगले साहित्य प्रकाशित होत नाही. त्याला ई-बुक हा नवा पर्याय उपलब्ध झालेला आहे. अमेरिकेत ९० टक्के पुस्तके ई-बुकवर आहेत. ई-बुकमुळे पुस्तकाच्या पृष्ठसंख्येच्या मर्यादा गळून पडतात. प्रिंटिंगचा पर्यायाने कागदाचा खर्च वाचतो. आपण चांगले प्रकल्प घेऊन गेलो तर तंत्रज्ञानाचा फायदाच होऊ शकतो. किंबहुना हे माध्यम अधिक लोकाभिमुख होण्यास मदत होईल, असे जोगळेकर यांनी सांगितले.

कॉम्प्युटरचे जग आले तर माणसाने काय करायचे, असा थेट सवाल परिसंवादाचे अध्यक्ष निरंजन घाटे यांनी विचारला. ज्या गावात अनेक तास वीज नाही, त्यांनी काय करायचे, हाही सवाल आहे. इंडिया आणि भारत यामधील दरी कमी करण्यासाठी नव्या माध्यमाच्या प्रतिनिधींनी लक्ष केंद्रित करावे. विद्यार्थी संगणक हाताळू लागले आहेत, ही चांगली बाब आहे. संगणक हाताळताना त्यांच्या सर्जनशीलतेला वाव आहे का, असा सवालही त्यांनी केला. नव्या माध्यमांचा स्वीकार करताना जुन्याचेही जतन करणे आवश्यक आहे, असेही घाटे यांनी सांगितले.